ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH - APRIL 2023

Original Research Article

# आदिवासी अनुसूचित जमातीतील महिलांच्या आर्थिक सामाजिक सांस्कृतिक सबलीकरणाचा मानववंश शास्त्रीय अभ्यास

*डॉ. ज्ञानेश्वर ज. भामरे,

* सहयोगी प्राध्यापक, सेवा सदन कॉलेज ऑफ एज्युकेशन उल्हासनगर-3, जि ठाणे

**प्रस्तावना(Introduction)**

जागतिक महिला दिन देशभरात सर्वत्र साजरा केला जातो. या दिवशी महिलांचा दर्जा, त्यांचा सन्मान, त्यांच्या समस्या व सबलीकरण यांची सर्वदूर चर्चा होते परंतु महिलांचे खरोखर सबलीकरण झाले आहे काय? कितपत झाले आहे ?यांची उत्तरे आजही शोधली जातात. सदर संशोधनपर निबंधात संशोधकाने अनुसूचित जमातीतील महिलांच्या सबलीकरणाचा अभ्यास हा मानव वंशशास्त्रीय पद्धतीने(Anthropological ) केला आहे.

- मानववंश शास्त्राचा अर्थ (Meaning of Anthropology)

The study of human beings, especially of their origin, development, customs, and beliefs.

विशेषतः मानव जाती-जमातीचे मूळ, त्यांचा विकास ,त्यांच्या चालीरीती आणि श्रद्धा त्यांचे समाज जीवन लोकजीवन आर्थिक जीवन यांचा अभ्यास करणारे शास्त्र.

- मानववंश शास्त्राचे प्रकार –
  - ➔ पुरातत्व शास्त्र( Archaeology)
  - ➔ जैव मानववंश शास्त्र( Bio- Anthropology )
  - ➔ भाषिक मानववंश शास्त्र( Linguistic Anthropology )
  - ➔ सामाजिक -आर्थिक- सांस्कृतिक मानववंश शास्त्र( Social - Eco- Cultural Anthropology )

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

सदर संशोधन अभ्यास, अनुसूचित जमातीतील महिलांच्या आर्थिक- सामाजिक -सांस्कृतिक सबलीकरणाच्या दृष्टिकोनातून केला आहे.

**सदर संशोधन अभ्यासाची गरज व महत्त्व ( Need and importance of present study )**

शासनाची अनेक धोरणे ही महिला सबलीकरणासाठी निर्माण झाली असून त्यांची अंमलबजावणीही समाजात होताना दिसत आहे .बहुतेक अशासकीय ,सेवाभावी संस्था( NGO), देखील महिलांचे सबलीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहेत .भारतीय राज्यघटना, कायदे यांचा हेतू

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH - APRIL 2023

Original Research Article

देखील महिलांचे सबलिकरण व्हावे हाच आहे. त्यातल्या त्यात अनुसूचित जमातीतील विशेषतः आदिवासी महिलांमध्ये सबलीकरणांची विविध प्रयत्न झाले आहेत. या प्रयत्नांना यश प्राप्ती झाली की नाही? त्यांचे सबलीकरण कोणा कोणत्या क्षेत्रात झाले आहे? त्यांची याबाबतची सद्यस्थिती काय आहे? हे जाणून घेण्यासाठी सदर संशोधन हाती घेतले आहे. या संशोधनामुळे सबलीकरणाबाबत नवीन धोरण शासनाला बनवताना एक दिशा मिळेल आणि या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या संस्थांना समाजाला आदिवासी समाजाची सबलीकरणासंबंधी सद्यस्थिती समजेल.

**संशोधनाची उद्दिष्टे( Objectives of Research) :**

1. आदिवासी अनुसूचित जमातीतील महिलांच्या आर्थिक सबलीकरणाचा अभ्यास करणे.
2. आदिवासी अनुसूचित जमातीतील महिलांच्या सामाजिक सबलीकरणाचा अभ्यास करणे.
3. आदिवासी अनुसूचित जमातीतील महिलांच्या सांस्कृतिक सबलीकरणाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची व्याप्ती मर्यादा(Scope -Limitations):**

सदर संशोधन हे बदलापूर जिल्हा ठाणे परिसरातील आंबेशिव जवळील आदिवासी वाडीतील 50 आदिवासी महिलांपूरताच मर्यादित आहे. या आदिवासी महिलांमध्ये कातकरी वारली, ठाकर इ जमातींचा समावेश आहे.

**संशोधन पद्धती(Research Methodology):**

संशोधकाने संशोधनाच्या सर्वेक्षण पद्धतीने आणि मानववंशशास्त्र पद्धतीने संशोधन केले असून मानव वंशशास्त्रातील सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक (Socio-Eco-Cultural Anthropology) हा संशोधन दृष्टीकोन(approach) लक्षात घेतला आहे.

**नमुना निवड (Sampling ):**

बदलापूर जिल्हा ठाणे ग्रामीण परिसरातील आंबे शिव जवळील 50 आदिवासी महिलांची निवड यादृच्छिक पद्धतीने केली आहे. यातील महिला ह्या कातकरी, वारली, ठाकर, इ .आदिवासी जमातीतील आहेत.

**संशोधन साधने(Research Tool):**

महिला सबलीकरणाच्या आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक घटकांवर आधारित स्वनिर्मित प्रश्नावली, प्रासंगिक हेतूपूर्व निरीक्षण, (Incidental Purposefully observation) आणि अनौपचारिक मुलाखत(Informal Interview) ही संशोधनाची साधने संशोधनकर्त्याने माहिती संकलनासाठी उपयोगात आणली आहेत.

**माहितीचे विश्लेषण (Data Analysis):**

**Table 1 - आर्थिक सबलीकरण**

| अ. नं. | घटक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| 1 | आर्थिक उत्पन्न असलेल्या महिलांचे प्रमाण | 75% |
| 2 | शासकीय आर्थिक योजनांची महिलांमध्ये जागृती | 80% |
| 3 | आर्थिक अवलंबित्व | 65% |

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article




Table 2. सामाजिक सबलीकरण

| अ. नं. | घटक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| 1 | महिलांचा सामाजिक कार्यक्रमात सहभाग | 82% |
| 2 | महिलांचे सामाजिक नेतृत्व करण्याचे प्रमाण | 80% |
| 3 | सामाजिक मानसन्मान | 50% |
| 4 | महिलांची व्यसनाधीनता , आरोग्य | 2% |




Table 3 . सांस्कृतिक सबलीकरण

| अ. नं. | घटक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| 1 | महिलांचा सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नियोजनात सहभाग | 76% |
| 2 | महिलांचा कला विकास( नृत्य- चित्रकला) | 78% |
| 3 | विवाह संस्था स्वातंत्र्य -बंधने | 86% |
| 4 | पारंपरिक खाद्य संस्कृती | 67% |
| 5 | पाणीपुरवठा परिश्रम | 56% |




सदर आदिवासी वाडीतील आर्थिक उत्पन्न असलेल्या महिलांचे प्रमाण 75% आहे .बहुसंख्य महिलांचे मासिक उत्पन्न सरासरी 6000 रुपये आहे .हे उत्पन्न त्यांना बांधकाम मजूर, विटा निर्मिती मजूर ,म्हणून प्राप्त होते. 5%महिला या जंगलातून रानभाज्या, बोरे, जंगली आवळा

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME-X, ISSUE- II MARCH - APRIL 2023

Original Research Article

,जांभळे ,भाज्या आणून नजीकच्या शहरात विक्री करतात .त्यातून त्यांना आर्थिक उत्पन्न मिळते .तर 2% टक्के महिलांना बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक मिळकत मिळते.

80% महिलांमध्ये शासकीय आर्थिक योजनांबाबत जागृती झाली असून 65% अशा महिला आहेत की त्यांच्या कुटुंबातील इतर घटक त्यांच्यावर आर्थिक दृष्ट्या अवलंबून नाहीत .मात्र कुटुंबातील महिलांची दोन किंवा तीन अपत्ये त्यांच्यावर आर्थिक दृष्ट्या अवलंबून आहेत.

सामाजिक सबलीकरणाचा विचार करता 82% महिला सामाजिक कार्यक्रमात सहभाग दर्शवितात .अशा कार्यक्रमांमध्ये सहभाग घेण्यास पुरुष विरोध करीत नाहीत. त्यांना याबाबत स्वातंत्र्य असते. 80% महिला सामाजिक उत्सवात नेतृत्व करतात. हे महिलांच्या सामाजिक सबलीकरणाचे एक उत्तम लक्षण आहे. काही वेळा हे नेतृत्व राजकीय आरक्षणामुळे लाभते .50% महिलांना सन्मानाने वागवले जाते. ज्या कुटुंबात महिला आर्थिक बाजू सावरतात त्यांना मानसन्मान मिळतो .2% महिलाच व्यसनाधीन असून तंबाखू सेवन, धूम्रपान, मद्यपान अशी व्यसने त्यांना आहेत.

76% महिलांचा सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नियोजनात सहभाग असतो .बहुसंख्य महिलांना कार्यक्रमाच्या नियोजनाची आवड आहे .78% महिला पारंपरिक कला जोपासून आपली संस्कृती जतन करतात .या कलांमध्ये वारली चित्रकला आणि तारपा सारख्या लोकनृत्याचा समावेश आहे .बहुतेक लग्नास इच्छुक असलेल्या मुलींना आपला जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य आहे .परंतु पुरुषांकडून आदिवासी पोट जातीत विवाह करावा ही अपेक्षा केली जाते. 86% मुलींना जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य असल्याचे दिसले .या अनुसूचित आदिवासी जमातीतील महिलांची कुटुंब व्यवस्था बळकट असून घटस्फोटाचे प्रमाण नगण्य आहे. या महिलांच्या आहारात भात, नाचणीची लापशी (आंबील )तांदूळ किंवा नाचणीची भाकरी ,मोह अथवा खुडसणीचे तेल ,कडधान्य, रानभाज्या, भोपळा वर्गातील फळभाज्या असतात .पारंपरिक खाद्य संस्कृती 67% महिला जतन करीत आहेत .त्यांच्या पोशाखाबाबत सांगायचे झाल्यास त्यांच्या पारंपरिक पोशाखात बदल झाला असून नऊवारी गुडघ्यापर्यंत पातळ ,काष्टा (फडकी )यांची जागा आता सहावारी गोल साडी ,पंजाबी ड्रेस यांनी घेतली आहे .या महिला जिथे वास्तव्य करतात त्या वाडीत पाणीपुरवठा करण्याची नळ योजना आहे परंतु ती नादुरुस्त असून त्यातून पाणी येणे बंद आहे .पाण्यासाठी महिलांना बोअरवेल पंप, हापसा किंवा सार्वजनिक विहीर अथवा नैसर्गिक जलसाठे येथे पाण्यासाठी जावे लागते. 56% महिला सुमारे दीड किलोमीटर अंतरावरून डोक्यावर हंडा घेऊन पाणी आणतात ,जलसाठा करतात. हे परिश्रम महिलाच करतात.

**निष्कर्ष अनुमान( conclusions )**

- बहुसंख्य आदिवासी महिलांचे आर्थिक सबलीकरण

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME-X, ISSUE- II

MARCH - APRIL 2023

Original Research Article

झाल्याचे दिसून आले .याचे महत्त्वाचे कारण म्हणजे शासकीय योजनांविषयीची जनजागृती आंबेशिव जवळील आदिवासी वाडीतील महिलांमध्ये झाली असल्याचे दिसून आले .या महिलांची अपत्ये आर्थिकदृष्ट्या त्यांच्यावर अवलंबून असतात असे निदर्शनास आले त्याचे प्रमुख कारण म्हणजे मुलांनी शिक्षण घेऊन मोठे व्हावे अशी इच्छा या महिलांची होती .त्यामुळे त्यांना पैसे कमवण्यासाठी कोणतेही कामे या महिला सांगत नाहीत ,म्हणून या मुलांचे आर्थिक अवलंबित्व हे या महिलांवर आहे हे दिसून आले. अजूनही काही तुरळक महिला कुडाच्या झोपड्यांमध्ये त्यांचे वास्तव्य करीत आहेत याचे कारण म्हणजे शासकीय लाभ घेण्यात या महिलांची उदासीनता असल्याचे निदर्शनास आले त्यामुळे अल्प प्रमाणात का होईना अशा महिलांचे आर्थिक सबलीकरण झाले नाही परंतु आर्थिक सबलीकरण विकासाच्या दिशेने बहुसंख्य महिला वाटचाल करीत आहेत हे चित्र स्पष्ट आहे

- बहुसंख्या महिला या सामाजिक कौटुंबिक कार्यक्रमात सहभागी होतात त्या सामाजिक व राजकीय नेतृत्व देखील करतात. राजकीय आरक्षण हेही राजकीय नेतृत्व करण्यास त्यांना संधी व प्रेरणा देते असे दिसून आले. आदिवासी वाडीतील निम्म्या महिलांना सन्मानाने वागविले जाते या सामाजिक सन्मानाला त्यांचे आर्थिक सबलीकरण हेही कारण दिसून आले अत्यल्प महिला या व्यसनाधीन असून अशा महिलांचा वयोगट 60 ते 65 वर्षे असा निदर्शनास आला आहे अशा महिलांना धूम्रपान मद्यपान ही व्यसने आहेत महिलांच्या आरोग्याचा विचार करता बहुसंख्य महिला ह्या प्राथमिक आरोग्य केंद्रातून औषध सुविधा घेतात परंतु त्या अगोदर आपल्या आरोग्य विषयक समस्या त्या स्थानिक वैद् कडे मांडतात व त्याच्याकडून जडीबुटी औषधे घेतात या वैदूचे कोणतेही वैद्यकीय शिक्षण झालेले नसते परंपरेने मागील पिढीकडून त्याच्याकडे हे औषधी ज्ञान संक्रमित झालेले असते आंबेशिव जवळील या आदिवासी वाडीतील बहुसंख्य महिलांचे सामाजिक सबलीकरण झाल्याचे दिसून आले.

- बहुसंख्य महिला या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नियोजनात सहभाग घेतात. त्यामागे एक कारण असेही आढळले की ,बहुसंख्य पुरुष ही जबाबदारी टाळतात आणि महिलांना याबाबत आम्ही स्वातंत्र्य देतो असाही त्यांचा मानस होता .वारली चित्रकलेचे जतन स्थानिक पातळीवर विविध सण किंवा विवाह समारंभाच्या निमित्ताने या महिला करतात परंतु व्यापारी दृष्टिकोनातून या कलेतून पैसे कमावण्यासाठी त्यांना कोणतेही व्यासपीठ उपलब्ध नाही .तारपा हे पारंपारिक सामूहिक लोकनृत्य या महिला करतात. या लोकनृत्याचे प्रशिक्षण त्यांना नसते. अनुकरणाने व परंपरेने या महिला तारपा व ढोल यांच्या तालावर सहजतेने फेर धरतात या महिला आपली संस्कृती जतन व संवर्धन करण्यात यशस्वी झाल्याचे दिसून आले .या वसतीतील मुलींना प्रारंभी आंतरजातीय विवाहास मान्यता मिळवणे कठीण जाते मात्र नंतर विवाह

झाल्यानंतर त्यास विरोध होत नाही व समुदायात सामावून घेतले जाते .महिलांच्या घटस्फोटाचे प्रमाण अत्यल्प असून विधवा विवाहास मान्यता असते .या महिलांच्या पारंपारिक पोशाखात बदल झाला असून सांस्कृतिक सबलीकरणाचा प्रयत्न या वस्तीमध्ये दिसून आला . जलशुद्धीकरणाचा कोणताही प्रकल्प स्थानिक पातळीवर नसल्यामुळे नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतापासून त्यांना पाणी आणण्यासाठी परिश्रम करावे लागतात .अर्धवट नादुरुस्त नळ योजना हे त्यांच्या शारीरिक परिश्रमास कारणीभूत असल्याचे जाणवले असे असले तरी आदिवासी महिलांमध्ये सांस्कृतिक सबलीकरणाची प्रक्रिया मध्यम गतीने होत असल्याचे निदर्शनास आले .

थोडक्यात मानव वंशशास्त्रीय अभ्यासातून एक बाब लक्षात आली आणि ती म्हणजे आंबेशीव जवळील या आदिवासी महिलांचे आर्थिक सामाजिक सांस्कृतिक सबलीकरण होत असून यासंदर्भात या महिलांमध्ये जनजागृती दिसून आली आहे.

**संदर्भ( Refrences ):**

गारे गोविंद ,(2019)' महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' पुणे: कॉन्टिनेन्टल प्रकाशन .

देहाडराय स्वाती' तांबे अनघा (2009) 'स्त्रीयांच्या चळवळी आणि संघटना', पुणे :क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अध्ययन केंद्र, पुणे विद्यापीठ प्रकाशन.

Gender and women's Empowerment vil lll (2013) New Delhi : NCERT Publication.

Aadivasi Mahila Sashaktikatikaran Yojana (AMSY )-- https// www india filling .Com> learn.

*Cite This Article:*
***डॉ. भामरे ज्ञ. ज.** (2023). आदिवासी अनुसूचित जमातीतील महिलांच्या आर्थिक सामाजिक सांस्कृतिक सबलीकरणाचा मानववंश शास्त्रीय अभ्यास, **Educreator Research Journal, Volume–X, Issue– II**, March – April 2023, 42-47.*